# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

वाहतूक खाते,मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८

दूरध्वनी क्र.०२२-२३०२३९००. e mail: gmtraffic@msrtc.gov.in


क्र.राप/वाह/सवलत/ ४८०८ दिनांक: ०४/१२/२०२४

प्रति,

**प्रादेशिक व्यवस्थापक, संनियंत्रण समिती क्र.१,२,३ व ४**

**विभाग नियंत्रक,**

रा.प.मुंबई/पालघर/रायगड(पेण)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/छत्रपतीसंभाजीनगर/बीड/जालना/लातूर/नांदेड/अमरावती/धाराशिव/परभणी/नागपूर/भंडारा चंद्रपूर/ वर्धा/ गडचिरोली/ अकोला /यवतमाळ/बुलडाणा विभाग.

**विषय:-ज्येष्ठ नागरिक सवलतीकरिता ग्राहय धरण्यात येणा-या ओळखपत्रांबाबत.**

**संदर्भ:-** १.या कार्यालयाचे पत्र क्र.राप/वाह/सवलत/अ.जे.ना./२२१२, दि.२५.०८.२०२२

२.या कार्यालयाचे पत्र क्र.राप/वाह/सवलत/४३५, दि.३१.०१.२०२३

---

गृह विभाग शासन निर्णय क्र.एसटीसी-०८२२/प्र.क्र.२१८/परि-१, दिनांक ०६.०९.२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्यातील ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना रा.प.महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये मोफत प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील ६५ वर्षे ते ७५ वर्षापर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांना रा.प.महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये ५०% प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या परिपत्रक क्र.०८/२०२२,क्र.राप/वाह/सवलत/अ.जे.ना/२२१२, दि.२५.०८.२०२२ व पत्र क्र.राप/वाह/सवलत/४३५,दि.३१.०१.२०२३ अन्वये ज्येष्ठ नागरिकांना रा.प.वसेस प्रवासभाड्यात सवलतीकरीता आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, केंद्र/राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा-यांना दिलेली ओळखपत्र, [मात्र त्यावर फोटो, जन्मतारीख, रहिवासी पत्ता अनिवार्य आहे.] पासपोर्ट, ड्रायव्हींग लायसन्स, पॅनकार्ड, तहसिलदार यांनी दिलेले ओळखपत्र, डिजी लॉकर, एम आधार व रा.प.महामंडळाद्वारे देण्यात आलेले स्मार्टकार्ड ही ओळखपत्रे ग्राहय धरणेबाबत सर्व विभागीय कार्यालयास कळविण्यात आले आहे.

परंतु वाहकांद्वारे वरील नमूद ओळखपत्रे ज्येष्ठ नागरिक प्रवास करतेवेळी नाकारत असल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत.

तरी आपणांस पुनःश्च याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात नमूद ओळखपत्रांच्या आधारे ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात सवलत अनुज्ञेय करण्याबाबतच्या सुचना आपणाद्वारे आगार व्यवस्थापक यांस देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबत ज्येष्ठ नागरिक तक्रारी उद्भवणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

महाव्यवस्थापक (वाहतूक)

जा. क्र.राप / विनिप / वाह / प्रशा /७३६३
रा. प. विभागीय कार्यालय पुणे
दिनांक ०५.१२.२०२४

प्रत रवाना -

आगार व्यवस्थापक रा. प. शिवाजीनगर / स्वारगेट / भोर / नारायणगांव / राजगुरुनगर / तळेगांव / शिरुर / बारामती/ इंदापूर / सासवड / दौण्ड / पिंपरी-चिंचवड./ बारामती एमआयडीसी/मंचर आगार यांना वरीलप्रमाणे माहिती व कार्यवाहीसाठी -वरील पत्रात दिलेल्या सूचनेनुसार नमुद ओळखपत्रांच्या आधारे ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात सवलत अनुज्ञेय करण्याबाबतच्या सूचनांची कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबत ज्येष्ठ नागरिक तक्रारी उद्भवणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

विभाग नियंत्रक
रा.प.पुणे.